# आशा-गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीची आरोग्यमंत्र्यांसोबत चर्चा

## अनेक मागण्यांबाबत शासन सकारात्मक

सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य आशा-गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीच्या शिष्टमंडळाची राज्याचे आरोग्यमंत्री मा. प्रकाश अबिटकर, आरोग्य सेवा आयुक्त तथा संचालक मा. कादंबरी बलकवडे, सहसंचालक (अ. तांत्रिक) राजेंद्र भालेराव आणि राज्य समन्वयक स्वाती पाटील यांच्या सोबत आज सविस्तर बैठक पार पडली. या बैठकीत विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे कृती समितीने सांगितले.

बैठकीत आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी आशा व गटप्रवर्तकांना भाऊबीज भेट देण्याच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळ पातळीवर लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच, गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव




मागण्यांचे निवेदन देताना आशा-गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी.

केंद्र शासनाकडे पाठवून त्याचा पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. आरोग्य आयुक्त कादंबरी बलकवडे यांच्या दालनात झालेल्या चर्चेत मोबाईल रिचार्ज भत्ता १०० वरून वाढवून ३०० करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच नवीन मोबाईल देण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले.

सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्याबाबत मागील आदेश पुनर्विचारात घेण्यात येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. गटप्रवर्तकांसाठी एकसमान रंगाचा गणवेश देण्याबाबत चर्चा झाली. ऑनलाइन कामाबाबत सक्ती नाही असे स्पष्ट करण्यात आले असून, इतर विभागाकडून लावण्यात येणाऱ्या ऑनलाईन कामांविषयी संबंधित विभागांशी आयुक्त स्तरावर पत्रव्यवहार केला जाईल, असे आश्वासन देण्यात आले. थकीत मानधन त्वरित देण्यासाठी आणि लाडकी बहिण' योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या आशांना मोबदला मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. बायोमेट्रिक हजेरीची सक्ती रद्द करण्यात आली असून, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर दररोज हजेरी लावण्याची जबाबदारी राहणार नाही, असा दिलासा कृती समितीला मिळाला. विविध मागण्यांच्या मंजुरीसाठी दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी ११ वाजता भव्य मोर्चा आणि तीव्र निदर्शने करण्यात आली. या शिष्टमंडळात कॉ. राजू देसले, भगवान देशमुख, पुष्पा पाटील, आरमायटी इराणी, ज्योती उराडे, सिद्धाराम उमराने, रुपाली दोरकर, शाहीन शेख, मंगल वावरगिरे आदी उपस्थित होते.

### कृती समितीच्या प्रमुख मागण्या :

मे ते सप्टेंबर २०२५ या पाच महिन्यांचे केंद्रहिश्याचे थकीत मानधन तात्काळ द्यावे, दरमहा पाच तारखेपर्यंत नियमित मानधन केंद्र व राज्य निधीतून मिळावे, मोबाईल, सिम कार्ड व अमर्यादित डेटा पॅक मिळेपर्यंत ऑनलाइन कामावर बहिष्कार कायम ठेवावा, दिवाळीपूर्वी ५,००० ची भाऊबीज भेट देण्यात यावी. गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या श्रेणीत समाविष्ट करून ३५,००० किमान वेतन लागू करावे, बायोमेट्रिक हजेरी रद्द करावी, प्रसूती व आजारपणासाठी भरपगारी रजा लागू करावी. कार्यरत असताना मृत्यू झाल्यास वारसांना १० लाख नुकसानभरपाई देण्यात यावी.

# पिंपळाच्या पानावर रेखाटली अमिताभ बच्चन यांची कलाकृती

कराड : महानायक, स्टार ऑफ द मिलेनियम अर्थात बिग बी' अमिताभ बच्चन यांचा दि.११ ऑक्टोबर रोजी ८३ वा वाढदिवस साजरा झाला. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी शेतीमित्र डॉ. संदीप डाकवे यांनी 'जंजीर' या चित्रपटातील अमिताभ बच्चन यांची पिंपळपानावर सुंदर कलाकृती साकारली आहे. हे अनोखे चित्र तयार करुन त्यांनी अमिताभ यांना चित्रमय शुभेच्छा दिल्या आहेत. या कलाकृतीने सर्वांनाच भुरळ घातली आहे.



विविध माध्यमातून कलाकृती रेखाटण्यात माहीर असलेल्या डॉ. संदीप डाकवे यांनी पिंपळ पानाचा नको असणारा भाग कापून अमिताभ यांची हुबेहुब कलाकृती साकारली आहे. पिंपळाच्या पानावर चित्र रेखाटण्यासाठी पेन्सिल, ऑपरेशन ब्लेड, इत्यादी साहित्याचा वापर करण्यात आला आहे. डॉ. संदीप डाकवे यांनी रेखाटलेल्या चित्रांची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स', वर्ल्ड ग्रेटेस्ट रेकॉर्ड, हायरेंज बुक ऑफ रेकॉर्ड या पुस्तकाने घेतली आहे. डॉ. डाकवे यांनी यापूर्वी गौतम बुध्द, आण्णा भाऊ साठे, हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची पिंपळ पानावर अप्रतिम चित्रे रेखाटली आहेत.



वीज वितरण कर्मचाऱ्यांवा संपाला पाठिंबा देताना अस्मिता गायकवाड व इतर.

## वीज वितरण कर्मचाऱ्यांच्या संपाला उबाठा गटाचा पाठिंबा

सोलापूर : खासगीकरणाच्या विरोधात सुरू असलेल्या वीज वितरण कर्मचाऱ्यांच्या संपाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व सोलापूर शहर व जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने एकमुखी पाठिंबा देण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा कर्मचाऱ्यांच्या समर्थनार्थ त्यांच्यासाठी रस्त्यावर उतरू, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी दिला. यावेळी नितीन चव्हाण, उल्हास कानगुडे, विजयकुमार राकले, एन. टी. मुजावर, पी. एल. जाधव लॉरेन्स डोंगरे, सिद्राम चव्हाण, जुबेर शेख, एल डी चव्हाण, संजय जाधव, प्रवीण माने पाटील यांच्यासह शहर संघटिका प्रीती नायर, उपशहर संघटिका जयश्री पाटील, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगर, उपशहर प्रमुख सुरेश जगताप,लहू गायकवाड, आबा सावंत आदी पदाधिकारी व वीज वितरण कर्मचारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी दशरथ गुरव, सुदेश मालप, डॉ. आनंद चव्हाण, प्रा. शरणबसवेश्वर वांगी, प्रमोद कुणगुलवार, प्रबुद्ध चिंचोलकर आदी.

## हँडबॉल स्पर्धेत असावा अन् सुयश विद्यालयाला विजेतेपद

सोलापूर : जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा कार्यालय तसेच महापालिका क्रीडा कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या अंतर शालेय हँडबॉल स्पर्धेचे उद्घाटन शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत असावा आणि सुयश विद्यालयापे विजेतेपद पटकावले. उद्घाटन सोहळ्यास सोलापूर हँडबॉल असोसिएशनचे सचिव सुदेश मालप, सोलापूर शहर मुख्य हँडबॉल प्रशिक्षक डॉ. आनंद चव्हाण, प्रा. शरणबसवेश्वर वांगी, क्रीडाशिक्षक प्रमोद कुणगुलवार, प्रबुद्ध चिंचोलकर आदी उपस्थित होते. ही स्पर्धा १४, १७ व १९ वर्षातील मुला मुलींच्या वयोगटात होणार आहेत. सूत्रसंचालन व आभार प्रा. राहुल हजारे यांनी केले. सदर स्पर्धा पार पाडण्यासाठी अजिंक्यतारा स्पोर्ट्स फाउंडेशनचे पंच व सर्व खेळाडू परिश्रम घेत आहेत. उद्घाटनप्रसंगी घेण्यात आलेल्या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये असावा संघाने विजय संपादन केला तर १७ वर्ष वयोगटाखालील मुलींच्या स्पर्धेत सुयश विद्यालयाने विजेतेपद मिळवले.




मेळाव्या दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना ब.स.पा. नेते राजाराम व इतर.

## कांशिराम यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बसपाचा मेळावा

सोलापूर : डी. एस. फोर, बाससेफ व ब.स.पा.चे संस्थापक कांशिरामजी यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदेश युनिटच्या वतीने अभिवादन सभा व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, न्यु. बुधवार पेठ, सोलापूर या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन ब.स.पा., सोलापूर जिल्हा कमिटीच्यावतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास बसपाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश प्रभारी माजी राज्यसभा खासदार राजाराम व प्रदेश अध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी राजाराम यांनी आलेल्या कार्यकर्त्यांशी भाषांणाद्वारे संवाद साधला. तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे यांनी कार्यक्रमास मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सोलापूर शहर-जिल्ह्यातील बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्ते, पदाधिकारी, कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रदेश सचिव ड. संजीव सदाफुले, प्रदेश सचिव अप्पासाहेब लोकरे, जिल्हाध्यक्ष बबलू गायकवाड व शहर अध्यक्ष देवा उघडे आदींनी केले.

## सेवालाल नगरात मारहाण ;महिलेसह तिघे जखमी

सोलापूर : मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील सेवालाल नगरात किरकोळ भांडणातून लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत महिलेसह तिघेजण जखमी झाले.ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. देवाबाई पांडुरंग राठोड (वय ५०), पूनम लक्ष्मण चव्हाण (वय १५) आणि तिचा भाऊ सोमू चव्हाण (वय १७ सर्व रा. मंद्रुप) अशी जखमीची नावे आहेत. त्यांना मंद्रुप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना युवराज राठोड सुरज राठोड आणि इतर दोघांनी मिळून त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




# चौधरी फौंडेशनच्यावतीने मंगळवारी जुळे सोलापुरात गीत रामायणाचे आयोजन

सोलापूर : चौधरी फौंडेशनच्यावतीने मंगळवार दि. १४ ऑक्टोबर रोजी सायं. ६ वा. जुळे सोलापुरातील विलासचंद्र मेहता शाळेच्या प्रांगणात गीत रामायण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती फौंडेशनचे संस्थापक चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. गेल्या अनेक वर्षापासून चौधरी फौंडेशनतर्फे सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. निरुपणकार विवेक यळसासी हे कथेच्या माध्यमातून निरूपण करणार आहेत. स्वरध्यास संगीत विद्यालय सोलापूरच्या रसिका कुलकर्णी व सानिका कुलकर्णी यांचा विशेष सहभाग असणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. सोलापूरकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन फौंडेशनचे संस्थापक चेतन चौधरी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस रसिका कुलकर्णी, जतीन कुलकर्णी, श्याम कांबळे, अनिकेत लांबतुरे उपस्थित होते.

# चंदनशिवे-पुजारी यांचा पाठपुरावा

## बाळेतील पूरग्रस्तांच्या खात्यावर शासनाकडून अनुदान जमा

सोलापूर/प्रतिनिधी

शहर - जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यापासून मोठ्या प्रमाणात पाऊस व अतिवृष्टी झाल्यामुळे बऱ्याच भागामध्ये पर्जन्य परिस्थिती निर्माण झाली होती. बाळे परिसरातील अनेकजण पुरामुळे बाधित झाले होते. त्यांना शासनाकडून मदत मदत मिळण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे व माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी पाठपुरावा केला होता. अखेर त्यांना यश आले आहे.

बाळे परिसरातील राहुल नगर पाटील नगर माहेश्वरी नगर व संतोष नगर या परिसरातील बऱ्याच घरांमध्ये नाल्याचे पाणी शिरले आहे. कुटुंबाचे अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू भिजले असून काही घरांचे पडझड झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त भागांचे ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक त्याचबरोबर सोलापूर महानगरपालिका विभागीय अधिकारी तसेच स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत पंचनामे करून महापालिका प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन यांच्याकडून राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला.



राज्य शासनाने मागील आठवड्यामध्ये दिवाळीपर्यंत सर्व नुकसान बाधित कुटुंब व शेतकरी यांना रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल असे आश्वासित केल्या नुसार प्रत्यक्षात नुकसानग्रस्त कुटुंबाच्या खात्यावर पैसे जमा झाले. नुकसानग्रस्त भागातील कुटुंबांना मदत मिळण्याकरिता आनंद चंदनशिव, गणेश पुजारी मंडल अधिकारी संतोष कांबळे, ग्राम महसूल अधिकारी सिद्धाराम कराळे, कृषी अधिकारी तृप्ती गुंड, महसूल सेवक राहुल तोडकरी, सोलापूर महानगरपालिकेचे विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, अभियंता राघवेंद्र गायधनकर, सहाय्यक अभियंता गौरव सरते, विकास सर्वगोड, अग्निशामक दलाचे कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# प्रमोद आवताडे यांना 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार प्रदान

पुणे/प्रतिनिधी

शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत 'लोकशाही' या संस्थेकडून दिला जाणारा प्रतिष्ठित 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्री. प्रमोद आवताडे यांना नुकताच पुण्यात एका शानदार समारंभात प्रदान करण्यात आला. भारतीय जनता पक्षाचे नेते आणि माजी महापौर सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते आवताडे सरांना हा बहुमान मिळाला.

पुणे शहरात आयोजित करण्यात आलेल्या या दिमाखदार सोहळ्याला शिक्षण, समाजकारण आणि राजकारण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रा. आवताडे सरांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

पुरस्कार वितरणानंतर मुरलीधर मोहोळ यांनी प्रा. आवताडे सरांच्या कार्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, 'समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य शिक्षण करत असते आणि प्रा. आवताडे सरांनी आपले संपूर्ण आयुष्य या पवित्र कार्यात समर्पित केले आहे. अशा निःस्वार्थपणे काम करणाऱ्या व्यक्तीला सन्मानित करणे, ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.'

पुरस्कार स्वीकारल्यानंतर आवताडे म्हणाले, 'हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून, माझ्यासोबत कार्यरत असलेल्या संपूर्ण टीमचा सन्मान आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आम्ही यापुढेही अधिक उत्साहाने काम करत राहू.'




# उर्दू साहित्य अकादमीकडून अख्तर पुरस्काराने सन्मानित

सोलापूर : महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबईने लघुकथाकार, भारतीय उर्दू विकास फाउंडेशनचे अध्यक्ष, सोशल उर्दू हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक सुलतान अख्तर शेख यांना उर्दूच्या सर्वांगीण प्रचार व प्रसाराठी विशेष पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. डोम स्टेडियम, वरळी, मुंबई येथे आयोजित बिहार उर्दूच्या भव्य सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात अल्पसंख्याक मंत्रालयाचे सचिव रूपेश जयवंशी आणि आयुक्त प्रतिभा इंगळे, शोएब हाशमी अल्पसंख्याक आयुक्तालय यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# दामाजी कारखान्याच्या दिवाळी साखरेचे बुधवारपासून वाटप

मंगळवेढा/प्रतिनिधी

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्यावतीने सभासदांसाठी दिवाळी सणानिमित्त सवलतीच्या दराने दिली जाणारी साखर बुधवार दि. १५ ऑक्टोबर ते दि. १९ ऑक्टोबर या कालावधीत प्रति किलो २० रू. प्रमाणे २५ किलो प्रत्येक साखर केंद्रावर सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत दिली जाणार असल्याची माहिती चेअरमन शिवानंद यशवंत पाटील यांनी दिली. कारखाना साईट, नागणेवाडी ऑफिस, खोमनाळ नाका, ब्रह्मपुरी, माचणूर, सिद्धापूर, बोराळे, अरळी डोणज मरवडे हुलजंती, भोसे नंदेश्वर, सोड्डी हुन्नूर, पाठखळ, आंधळगाव, लक्ष्मी- दहिवडी, मारापुर, मल्लेवाडी, सलगर बु, मारोळी निंबोणी तळसंगी गोणेवाडी शिरनांदगी चिक्कलगी, महमदाबाद (हु), लें.चिंचाळे, येथील साखर विक्री केंद्रावर आपले साखर कार्ड नोंद करुन साखर घ्यावी, केंद्रावरुन वेळेत न उचल केलेल्या सभासदांची साखर कारखाना साईटवर दर शुक्रवारी स. १० ते सायं. ५ या वेळेत डिसेंबर अखेरपर्यंत देण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्र.कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी दिली. याप्रसंगी कारखान्याचे व्हा.चेअरमन तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर आदी होते.




# विद्यार्थ्यांनी व्यवहार चातुर्याचे शिक्षण घ्यावे : डॉ. बोस

## प्रा. डॉ. कराड गव्हर्नर्स अवॉर्ड ऑफ एक्सलन्सने सन्मानित

पुणे/प्रतिनिधी

व्यवहार चातुर्याचे शिक्षण आणि 'मिशन ॲण्ड द ॲक्शन' या दोन तत्वांच्या आधारे विद्यार्थ्यांनी आयुष्याची पुढील वाटचाल करावी. नेल्सन मंडेला सतत म्हणायचे समाज परिवर्तनासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे शस्त्र आहे. तसेच, शिक्षणातूनच सर्वात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी डिग्री घेतल्यानंतरही सतत अध्ययन करावे, असे विचार पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी. व्ही. आनंद बोस यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा ७वा दीक्षांत समारंभ शनिवारी विश्व सभामंडप, विश्वराजबाग, लोणीकाळभोर, पुणे येथे पार पडला. यावेळी विद्यापीठाच्या ६८०० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आयुष्यभर शिक्षण




प्रा. डॉ. कराड यांचा गव्हर्नर्स अवॉर्ड ऑफ एक्सलन्स ने सन्मान करताना राज्यपाल डॉ. सी.व्ही. आनंद बोस व इतर.

आणि शांतीसाठी केलेल्या कार्याबद्दल पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी. व्ही. आनंद बोस यांनी विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांना 'गव्हर्नर्स अवॉर्ड ऑफ एक्सलन्स' ने गौरविण्यात आले.

यावेळी आंतरराष्ट्रीय व्यवसाय सल्लागार आणि लेखक प्रा. डॉ. राम चरण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड हे अध्यक्षस्थानी होते. एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, कुलसचिव प्रा. गणेश पोकळे, डॉ. सुनीता मंगेश कराड, डब्ल्यूपीयूचे सीईओ डॉ. प्रसाद खांडेकर, सीओओ डॉ. संतोष सोनावणे आणि परीक्षा नियंत्रक डॉ. राहुल जोशी तसेच विद्यापीठाचे अधिष्ठाता व संचालक सर्व उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी श्वेता राजश्री अय्यर हिला 'फाउंडर प्रेसिडेंट मेडल' व वेदांगी गुणेश पाटकर हिला एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट मेडल' ने गौरविण्यात आले. तसेच ११४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, ९६ रौप्य आणि ९६ कांस्य पदक असे एकूण ३०६ विद्यार्थ्यांना मेडल देण्यात आले. तसेच ३७ विद्यार्थ्यांना पीएचडी देण्यात आली.

प्रा. डॉ. कराड म्हणाले, 'भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञान ही तत्व जीवनात शांती निर्माण करतात. विद्यार्थ्यांनी शिस्त आणि वचन बद्धतेचे पालन करावे. तसेच धर्म आणि स्वतःच्या कर्तव्याला ओळखावे, भविष्यात सुख-समाधान आणि शांतीचा मार्ग दाखविण्याचे दायित्व भारताचे आहे. कुलगुरू डॉ. चिटणीस यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राहुल जोशी यांनी आभार मानले.